**Corporate Communications & Investor Relations**
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn.

# वृत्तपत्रीय निवेदन

## बँक ऑफ महाराष्ट्रच्या वतीने आयोजित ग्राहक जोडो कार्यक्रमांत वित्तीय सेवा विभागाचे सचिव श्री संजय मल्होत्रा सहभागी

**पुणे दिनांक ५ सप्टेंबर २०२२** : देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील अग्रणी बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे दिनांक ३ सप्टेंबर २०२२ रोजी पी वाय सी जिमखाना पुणे येथे ग्राहक जोडो व ग्राहक भेट कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी वित्तीय सेवा विभागाचे सचिव श्री संजय मल्होत्रा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. वित्तीय सेवा विभागाचे संयुक्त सचिव श्री भूषण कुमार सिन्हा देखील या कार्यक्रमास उपस्थित होते. तसेच बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव , कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार व श्री आशिष पांडे, पुणे पूर्व, पश्चिम व शहर विभागीय कार्यालयांचे सरव्यवस्थापक व अन्य अधिकारी व कर्मचारी देखील या कार्यक्रमास उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या पूर्वी श्री संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली बँकेच्या मुख्यालयात बँकेच्या वरिष्ठ व्यवस्थापन बैठक झाली. त्यामध्ये श्री मल्होत्रा यांनी बँकेच्या कामगिरीचा आढावा घेतला.

ग्राहक जोडो व ग्राहक भेट कार्यक्रमात संबोधित करताना वित्तीय सेवा विभागाचे सचिव श्री संजय मल्होत्रा यांनी सार्वजनिक क्षेत्रातील सर्व बँकांमध्ये व्यवसाय विकसित करण्यात अव्वल क्रमांक प्राप्त केल्याबद्दल बँकेचे अभिनंदन केले. ग्राहकाच्या गरजा केंद्रस्थानी ठेऊन बँकिंग सेवांची सुलभता वाढवण्यासाठी भारत सरकारने परिकल्पित केलेल्या आवश्यक त्या सुधारणा करण्यास बँकेने सर्वोच्च प्राधान्य द्यावे यावर त्यांनी भर दिला. आपल्या विविध योजना व सेवांमध्ये डीजीटल माध्यमातून नाविन्यपूर्णता आणून ग्राहकांच्या अधिकाधिक समाधानकारक व संतोषजनक बँकिंग सेवा मिळण्याची व्यवस्था बँकेने करावी अशा सूचना त्यांनी बँकेला दिल्या. मागील दोन वर्षातील कामगिरीसाठी त्यांनी बँकेचे अभिनंदन केले.

कार्यक्रमास संबोधित करताना बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांनी , वित्तीय सेवा विभागाचे सचिव श्री संजय मल्होत्रा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेला हा कार्यक्रम म्हणजे बँकेसाठी अभिमानाची बाब असून यातूनच आमच्या भविष्यातील प्रवासाचे सूचन होणार आहे. ग्राहक जोडो व ग्राहक भेट कार्यक्रम म्हणजे रिटेल, कृषी, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना कर्ज वितरण व वित्तीय सक्षमीकरण यासठी बँक घेत असलेल्या परिश्रमांचे दृश्य स्वरूप झाले आहे. त्यामुळे बँकिंग सेवेपासून वंचित राहिलेल्या घटकांच्या पर्यंत पोहोचून त्यांना बँकिंग सेवा पुरविण्यात व बँकिंग प्रणालीत त्यांना समाविष्ट करण्यात बँक यशस्वी झाली असल्याचे ते म्हणाले. केंद्र शासनाच्या सामाजिक सुरक्षा व अनेक महत्वाचा कर्ज व अन्य योजना या डिजिटल माध्यमातून परिणामकारक पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी व त्याचे इच्छित परिणाम साध्य करण्यासाठी बँक सातत्याने कार्यरत राहिली असून यापुढे देखील कार्यरत राहील अशीही ग्वाही त्यांनी दिली .

वित्तीय सेवा विभागाचे सचिव श्री संजय मल्होत्रा व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत विविध लाभार्थ्यांना रु १००० कोटी पेक्षा जास्त रकमेची कर्ज मंजुरी पत्रे वितरीत करण्यात आली. तसेच सदर कार्यक्रमांतील बचत गटांच्या दालनास वित्तीय सेवा विभागाचे सचिव श्री संजय मल्होत्रा यांनी भेट दिली व तेथील

**Corporate Communications & Investor Relations**
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn.

उपस्थितांशी संवाद साधला. उपस्थित पीएमजेजेबीवाय लाभार्थ्यांशी सुद्धा त्यांनी संवाद साधला. आपल्या देशाला सर्व बाबतीत आत्मनिर्भर करण्याचे आवाहन श्री मल्होत्रा यांनी सर्वांना केले.

बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री आशिष पांडे यांनी आभार प्रदर्शन केले .




**छायाचित्रामध्ये** वित्तीय सेवा विभागाचे सचिव श्री संजय मल्होत्रा हे लाभार्थ्यांना कर्ज मंजुरी पत्रे वितरीत करताना. ( त्यांच्या डावीकडून ) बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव , वित्तीय सेवा विभागाचे संयुक्त सचिव श्री भूषण कुमार सिन्हा, ( त्यांच्या उजवीकडे ) बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार व श्री आशिष पांडे व सरव्यवस्थापक श्री राजेश कुमार सिंह